# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/५८९ /२०१६/२०

**(नोदंणी क्रमांक २०१६०७०००१ )**

तक्रार दाखल दिनांक :- ०२.०७.२०१६
निकाल दिनांक :- १०.०८.२०१६

श्री. कचरु साधु चोथे, तक्रारदार
मु, औराळी, पो. औराळा,
ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद ४३१ ००१.
( ग्राहक क्रमांक ५०३२९००००२९९ )

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
ग्रामीण मंडल, औरंगाबाद.

## मंच

१ ) डॉ.भास्कर पालवे अध्यक्ष
२ ) श्री. उत्तम.म.उरकुडे सदस्य / सचिव
३ ) श्री. वि. सु काबरा सदस्य

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार कचरु साधु चोथे तर्फे श्री. साहेबराव कचरु चोथे रा. औराळा, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद, (ग्राहक क्रमांक ५०३२९००००२९९) यांनी दिनांक ०२-०७-२०१६ रोजी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफीसर, ग्रामीण विभाग, महावितरण, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या अनुसूची अ नमुन्यात तक्रार दाखल केली आहे तक्रारीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

माहे जानेवारी २०१५ चे एकत्रित युनिटचे ( ४६७१ ) वीजबील रदद करुन सुधारीत वीजबीलाची मागणी केलेली आहे. नवीन मिटर बसविल्यापासून ते जुने मिटर काढुन नेलेल्या महिन्या पर्यंत एकुण महिन्यांचे सुधारीत बील देण्याची मागणी केलेली आहे.

ग्राहकाचे जुने मीटर क्रमांक ३४१७०३३ वरील रिडींग ७५३२ असे आहे. हे जुने मीटर ८/९ वर्षे वापरले आहे. असे त्यांनी त्यांच्या दिनांक १०.०८.२०१६ च्या म्हणण्यात सादर केले आहे. त्यानुसार त्यांचा वापर सरासरी खालील प्रमाणे आहे.

एकुण ९ x १२ = १०८ महिने

सरासरी दरमहा वापर ७५३२ / १०८ = ७० युनिट

ग्राहकाने जुन्या मिटर प्रमाणे ८ महिन्यांचे वीजबील भरलेले नाही.

ग्राहकांस नवीन मिटर दिनांक १२.०५.२०१५ रोजी बसवुन दिलेले आहे. सदर १४ महिने करीता ७४६ युनिटचा वापर झाला आहे. म्हणजे प्रतिमहिना ५४ युनिट वीज वापर आहे.

त्यामुळे ग्राहकाने वरील प्रमाणे वीज बीलाची दुरुस्ती करण्यात यावी व या प्रकरणात मानसिक, आर्थिक व वेळेचा दुरुपयोग झाल्याने रुपये ६०००/- नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**कार्यकारी अभियंता (प्रशासन ) नोडल ऑफिसर,ग्रामीण विभाग,महावितरण, औरंगाबाद तर्फे श्री. पी. एम. राजपुत, कार्यकारी अभियंता, कन्नड विभाग यांचे म्हणणे**

दिनांक ११.०७.२०१६ च्यापत्रानुसार ग्राहकाची तक्रार बहुतांशी मान्य करुन ग्राहकास ४६७१ युनिटचे एकत्रपणे आलेले बील विभागुन देऊन (-बी-८०) रु.१६७६०/- दुरुस्त करुन देण्यात आलेले आहे.

माहे जानेवारी २०१५ च्या बीलावरील त्यांचा मीटर क्रमांक ३४१७०३३ चा एचपीएल कंपनीच्या मीटर डिस्प्लेवर चालु रिडींग ७५३२ असे स्पष्ट दिसत आहे. हया पुराव्यामुळे ४६७१ युनिटचे बील रदद होणार नाही.

दिनांक १७.१२.२०१५ च्या अंतर्गत गाऱ्हाणे निवारण कक्षाच्या आदेशानुसार ४६७१ युनिटचे एकत्रित बील दुरुस्त करुन देण्यात आल्यामुळे सदरील ग्राहकाची तक्रार निकालात काढण्यात आली आहे. नवीन इलेक्ट्रीक मीटर (दिनांक १२.०५.२०१५ रोजी) बसविल्यापासून (१२.०५.२०१५) नंतर आलेल्या सरासरी ५८४ युनिटचे आठ महिन्यांचे बील या पुर्वीच माहे सप्टेंबर २०१५ मध्येच दुरुस्त करुन सुधारीत बील देण्यात आलेले आहे. सप्टेबर २०१५ पुर्वी ग्राहकाचे वीजबील रुपये ७५१८२ असे होते. त्यातील रुपये ३८६००/- रुपयांची दुरुस्ती करुन उर्वरित बील रुपये ३८२७०/- माहे सप्टेंबर २०१५ मध्ये देण्यात आले आहे. ग्राहकाने दिनांक २१.०१.२०१५ पासून एकाही बीलाचा भरणा केलेला नाही. तरी अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात यावा.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष**

१ ) ग्राहकास माहे जानेवारी २०१५ चे एकत्रित युनिट ४६७१ साठी रुपये ४५०९८.२९ चे बील देण्यात आलेले आहे. त्या मीटरचा क्रमांक ३४१७०३३ असून सदरचे मीटर माहे जुलै २००० ला बसविण्यात आलेले आहे. त्याचा सरासरी दरमहा वापर ७५३२/४३= १७५ (अंदाजे) युनिट प्रतिमाह असल्याचे निदर्शनास येते.

२ ) ग्राहकाने दिनांक १८.०२.२०१५ ला उपविभागीय कार्यालयास माहे फेब्रुवारी २०१५ चे विदयुत बील सरासरी आकारणीनुसार रुपये ४८१३०/- चे बील मिळाल्याने, मीटर बंद असल्याने बदलुन देण्याबाबत व योग्य बील देण्याबाबत तक्रार अर्ज सादर केला आहे.

३ ) महावितरणने सदरच्या तक्रारीची दखल न घेता माहे फेबुवारी २०१५ ते ऑगस्ट २०१५ पर्यंत प्रतिमाह ५८४ युनिट सरासरीने ग्राहकास बीले दिली आहेत.

४ ) सदरच्या बिलाची दुरुस्ती Bill Revision ID – २१५६९९३ दिनांक ११.०५.२०१५ अन्वये ५२५२ युनिटचे एकुण २७ महिन्यात विभागणी करुन एकुण रुपये १६७६०.६० ची वजावट माहे मे २०१५ च्या बिलात दर्शवुन रुपये ५५७१४.९४ चे बील ग्राहकास दिले आहे.

५) माहे सप्टेंबर २०१५ चे बिलामध्ये माहे फेब्रु २०१५ ते ऑगस्ट २०१५ चे सरासरी बीलाची रक्कम रु. ३८६००.०४ वजावट करुन रु. ३८२६८.६१ चे दुरुस्ती बील ग्राहकास देण्यात आले आहे.

६ ) ग्राहकाने वीज बीलाचा भरणा दिनांक २३.०९.२०१४ नंतर दिनांक २१.०१.२०१५ ला फक्त रुपये १०००/- चा केलेला आहे, या नंतर बिलाचा भरणा केलेला नाही व विज वितरण कंपनीने थकीत वीज बील वसुलीची/वीज पुरवठा तात्पुरता बंद करण्याची कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

७) ग्राहकाच्या म्हणण्यानुसार मीटर क्रमांक ३४१७०३३ हे दिनांक १२.०५.२०१५ ला बदलविण्यात आले आहे व त्यावेळेस अंतिम मीटर वाचन हे ७५३२ असे होते व नवीन मिटर क्रमांक ४२०२११९ हे लावण्यात आले आहे. सहाय्यक अभियंता, चापानेर यांच्या दिनांक १८.०६.२०१५ च्या स्थळ तपासणीनुसार त्यावेळस मीटर क्रमांक ४२०२११९ असल्याचे व मीटर बदली अहवाल दिनांक ११.०९.२०१५ ला पाठविल्याचे आढळते. त्यामुळे ग्राहकाचे सीपीएल नुसार सदरचे मीटर सप्टेंबर २०१५ मध्ये बदलविल्याचे दर्शविले आहे.

८) सीपीएलचे अवलोकन केले असता मीटर रिडींग अंदाजे घेतल्याचे दिसून येते. सप्टेंबर २०१३, एप्रिल २०१३, डिसेंबर २०१३, फेब्रुवारी २०१४, मार्च २०१४, एप्रिल २०१४, जून २०१४, जुलै २०१४, ऑगस्ट २०१४, सप्टेंबर २०१४, ऑक्टोबर २०१४, नोव्हेंबर २०१४, डिसेंबर २०१४, फेब्रुवारी २०१५, मार्च २०१५ आणि एप्रिल २०१५ या महिन्यात मीटर रिडींग घेण्यात आली नाही. नोव्हेंबर २०१३ मध्ये मीटर रिडींग घेतले असे सीपीएल वरुन दिसते. परंतु मीटर रिडींगचे अवलोकन केले असता तसे वाटत नाही.

९) वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार, यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेल्या म्हणण्यानुसार ग्राहक गा-हाणे निवारण मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)	ग्राहकास महावितरणने दिलेले माहे जानेवारी २०१५ चे एकत्रित ४६७१ युनिटचे वीज बील रदद करण्यात येत आहे.

२)	महावितरणने माहे सप्टेंबर २०१५ ला दुरुस्ती करुन दिलेल्या बीलाचा भरणा ग्राहकाने करावा.

३)	महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके, विदयुत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणी भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०१४ चे परिशिष्ट -अ अनुक्रमांक -६ नुसार देयकाच्या तक्रारीचे निवारण माहे फेबुवारी मध्ये न करता मे २०१५ मध्ये केल्याने विलंबाबाबत प्रती आठवडा रुपये १०० ची भरपाई ही ग्राहकाच्या येणा-या बिलात समायोजित करण्यात यावी.

४)	नविन मीटर बाबत कोणतीही तक्रार नसल्यामुळे नवीन मिटरचे वीज बील रिडींग प्रमाणे ग्राहकाने भरावे.

५)	ग्राहकास कोणताही दंड व व्याज आकारु नये.

६)	सहाय्यक अभियंता, चापानेर यांनी मीटर बदली अहवाल उशिरा पाठविल्याने ग्राहकास चुकीची व अवाजवी बीले देण्यात आल्याने कंपनीचे आर्थिक नुकसान झाले. तसेच उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक लेखापाल, कन्नड उपविभाग यांनी वेळेवर व वाजवी वीज बील दुरुस्ती करुन दिले नाहीत. त्यामुळे त्यांचेवर मराविवि कं मर्यादितचे सेवा विनियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

७)	मीटर रिडींग दरमहा होत नसल्यामुळे मीटर रिडर यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

८)	केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| --- | --- | --- |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |